महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५५ वा | दिनांक : ०७/०८/२०२५ | वार : गुरूवार

# अखेर ठाकरे बंधूंची युती झालीच



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांचा रणसंग्राम अद्याप सुरू झालेला नसतानाच, मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या निवडणुकीत मात्र एक मोठी राजकीय घडामोड घडली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) युती करत बेस्ट कामगार पतपेढीची निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या युतीला स्थानिक स्वराज्य संस्था आणि मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

बेस्ट उपक्रमाच्या कामगार पतपेढीची निवडणूक येत्या १८ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे. कामगार संघटनांच्या सत्तेसाठी ही निवडणूक अत्यंत निर्णायक मानली जाते, कारण याच निवडणुकीच्या माध्यमातून बेस्टमधील संघटनांचे वजन ठरते. त्यामुळे शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोघांनी एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने या निवडणुकीचे राजकीय परिमाण वाढले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या मार्गांनी चाललेल्या ठाकरे बंधूंनी यावेळी 'मराठीसाठी एकत्र' येण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येते. बेस्ट कामगार सेना अध्यक्ष सुहास सामंत आणि मनसेचे मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्यात मागील काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. अखेर उच्चपातळीवर निर्णय घेऊन दोन्ही संघटनांनी बेस्ट पतपेढीची निवडणूक एकत्र लढण्याची घोषणा केली आहे.

बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी जारी केलेल्या पत्रात म्हटले की, बेस्ट उपक्रमाच्या कामगारांच्या पतपेढीची निवडणूक सोमवार दि १८ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर झालेली आहे. सोसायटी निवडणुकीत ज्या पॅनल ची सत्ता असते त्या कामगार संघटना बेस्ट उपक्रमात बलवान समजल्या जातात. महाराष्ट्रात सद्या ठाकरे ब्रँड चर्चेत आहे. मराठी च्या मुद्द्यावर एकत्र आलेले आणि मराठी अस्मितेचा स्वाभिमान असलेले दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास महापालिका च काय महाराष्ट्रात सरकार स्थापन करू शकतील अशी सर्वसामान्य लोकांची धारणा आहे.

बेस्टचे बहुतांश कामगार पुढारी, युनियन चे पदाधिकारी बेस्ट च्या बाहेर शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक म्हणून परिचित आहेत. तर कित्येक पदाधिकारी दोन्ही पक्षाचे पदाधिकारी आहेत. बेस्ट पतपेढी ची निवडणूक म्हणजे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीची नांदी आहे. त्यामुळे बेस्ट मधील ठाकरे बंधू च्या युती ला फार मोठे महत्व प्राप्त झाले आहे.

बेस्ट कामगार सेना अध्यक्ष सुहास सामंत आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्यामध्ये या युती बाबत मागील काही दिवसांपासून युती बाबत चर्चा सुरु होती. वरिष्ठांच्या आदेशानुसार दोन्ही नेत्यांनी निर्णय घेतल्याप्रमाणे आता बेस्टमधील प्रत्येक लढाई आता बेस्ट कामगार सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण बेस्ट कर्मचारी सेना एकत्रित लढणार आहे.

मराठी माणसाचा रोजगार म्हणजे बेस्ट उपक्रम पण विद्यमान सरकार मधील पुढारी आणि त्यांची धोरण काही उद्योगपती ना बेस्ट आंदण देण्यासाठी असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे बेस्टमधील मराठी कामगार हद्दपार होतं चालला आहे. त्यामुळे बेस्ट मध्ये ठाकरे ब्रँड एकत्र येणं म्हणजे मराठी माणसाची एकजूट मोठ्या ताकदीने उभी राहणार यांत शंका नाही.

बेस्ट कर्मचाऱ्यांना उद्धव ठाकरे सरकारच्या काळात ग्रॅज्युएटी साठी मुंबई महापालिका प्रशासन नियमित मदत करत होतं, पण जून २०२२ नंतर महायुती सरकार भाजप सतेत आल्या नंतर बेस्ट मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅज्युएटी वाढत चालली आहे. बेस्टचा स्व मालकीचा बसताफा कमी होत चालला आहे नवीन नोकर भरती नाही त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

बेस्ट पतपेढी मध्ये सध्या उद्धव ठाकरे यांच्या बेस्ट कामगार सेनेची सत्ता आहे. मागील नऊ वर्षांच्या कालावधीत बेस्ट कामगार सेनेच्या संचालक मंडळाने केलेल्या कामगार कल्याणकारी कामामुळे कामगारांचा प्रचाराला उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे त्यातच आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र आल्यामुळे अजून ताकद वाढली आहे याचा पतपेढीच्या निवडणुकीत सकारात्मक परिणाम होणार यात शंका नाही.

बेस्ट पतपेढीची ही निवडणूक मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक 'नांदी' म्हणून पाहिली जात आहे. त्यामुळे शिवसेना (उद्धव) आणि मनसे एकत्र येत असल्याचा हा प्रयोग भविष्यातील मोठ्या युतीकडे संकेत देणारा ठरू शकतो. राजकीय क्षेत्रात हा ठाकरेंच्या एकत्र येण्याच्या शक्यतेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिला जात आहे.

# मतदान शाळेत नको भाजपच्या कार्यालयात घ्या : बच्चू कडू



**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशीनचा वापर न करण्याच्या मुद्यावरून प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी यांनी निवडणूक आयोगावर तिखट हल्ला चढवाल आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर होत नसेल तर मतदान शाळेत घेण्याची काहीच गरज नाही. ते भाजपच्या कार्यालयात घेतले गेले पाहिजे, असे ते म्हणाले.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी राज्यात डिसेंबर - जानेवारी महिन्यात टप्प्याटप्प्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होणार असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर होणार नसल्याचेही स्पष्ट केले होते. त्यांच्या या निर्णयावर आता विरोधी पक्ष सडकून टीका करत आहेत. माजी आमदार बच्चू कडु यांनी बुधवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर या प्रकरणी आयोगाच्या निर्णयावर हल्ला चढवला. तसेच या प्रकरणी आयोगाला पत्र लिहिणार असल्याचेही ते म्हणाले.

आता निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरण्यात येणार नाही. त्यामुळे निवडणूक घेण्यापेक्षा भाजप कार्यालयात ठपके मारा. कारण, २-३ देश सोडले तर ईव्हीएम मशीन कुठेच वापरली जात नाही. त्यामुळे मतदान हे शाळेत न ठेवता भाजपच्या कार्यालयात ठेवण्याची मागणी करणारे पत्र निवडणूक आयोगाला पाठवणार आहे, असे बच्चू कडू म्हणाले. यावेळी त्यांनी पण राज ठाकरे यांची शेतकऱ्यांच्या मुद्यावर भेट घेतल्याचेही स्पष्ट केले. राज ठाकरेंसोबतची भेट राजकीय नव्हती. त्यांच्यासोबत शेतकऱ्यांच्या मुद्यावर चर्चा झाली. शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे हाच आमचा हेतू आहे.

सध्या शेतकरी अडचणीत आहे. पण सरकार त्याची टिंगल करत आहे. दुष्काळ पडला की कर्जमाफी मागतात असे मुख्यमंत्री म्हणतात. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही, हे शेतकऱ्यांचे दुःख दुष्काळाहून मोठे असते. त्यामुळे मी राज ठाकरे यांना आमच्या भागात येऊन शेतकऱ्यांना संबोधित करण्याची विनंती केली. मुंबईनेही आंदोलन सुरू असताना एक-दोन तास शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे रहावे. हा विषय कोणत्याही जातीधर्माचा किंवा पक्षाचा नाही. आमचा अजेंडा निवडणुकीचा नाही तर शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा आहे.

आम्ही शेतकऱ्यांसाठी लढत आहोत. शेतकऱ्यांचा विषय जनतेपर्यंत सरकारपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. ९ तारखेला रक्षाबंधन आहे. त्यामुळे आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेतकऱ्यांच्या वेदनांची राखी बांधणार आहोत, असे कडु म्हणाले.

मनसे नेते बाळा नांदगावकर यांनीही यावेळी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, मी राज ठाकरे यांच्या आदेशानुसार बच्चू कडू यांच्या पदयात्रेसह चक्काजाम आंदोलनात सहभागी झालो होतो. त्यांची भावना शेतकऱ्यांसाठी आहे. त्यात काहीही चुकीचे नाही. मराठवाडा, विदर्भातील शेतकरी व दिव्यांगांसाठी ते मोठे काम करतात. तिथे राज ठाकरे यांची एक सभा व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. त्याला साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शेतकऱ्यांसाठी मुंबई बंद रहावी यावर मनसे सकारात्मक आहे, असे ते म्हणाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ७ ऑगस्ट २०२५

## माळीवाडा येथे लोकशाहीर डॉ. आण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उस्ताहात साजरी



**दौलताबाद (जावेद अहमद)** : माळीवाडा येथे लोकशाहीर डॉ.आण्णा भाऊ साठे यांची 105 वी जयंती मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली.यावेळी झेडा वंदन दौलताबाद पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक रेखा लोढे यांच्या हास्ते करण्यात आले तसेच आण्णा भाऊ साठे पुतळ्यास सरपंच ज्योती मुळे,उपसरपंच मनेश गाजरे, पोलिस निरीक्षक रेखा लोढे मान्यवराच्या हस्ते हार घालुन पुजन करण्यात आले. यावेळी पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक रेखा लोढे यानी लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जिवना विषयी विचार माडले. व लहान मुलानी केलेल्या भाषणं केली मुलाला बक्षिसे वाटण्यात आली.तसेच जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थान च्या रुग्णवाहिका ड्रायव्हर व त्याचे साहकारी यांच्या सत्कार नामदेव धनायत,अक्षय कातखडे, साईनाथ पल्हाळ, सचिन सांगळे,तसेच उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार प्राप्त आण्णा जाधव व टेक्निकल असिस्टंट सहाय्यक पदी निवड अभिजित मधुकर दिवेकर यांचा सत्कार करण्यात आलायावेळी ग्रा.प.सदस्य धम्मापाल गायकवाड प्रविन बर्डे, कमलबाई अस्वार, ,शिक्षका ज्योती घोरपडे,ग्रामविकास अधिकारी गंगाधर हारदे,प्रमोद साठे, नंदकिशोर मुळे,एकनाथ सिरसाठ, जिल्हा परिषद शाळेचे मुख्यधापिका एस खडके,महात्मा फुले शाळेचे मुख्यधापक आनंद गोरे नदकिशोर मुळे,शिवाजी अस्वार, गणेश अस्वार, ताराबाई तुपे, भागूबाई आस्वार, पुष्पा ठोकळ, दगडाबाई आस्वार, असाराम अस्वार, प्रदिप अस्वार,श्रीकांत खंडागळे, सतिश अस्वार, राजु अस्वार, नितीन आस्वार, सुनिल बागूल, बंडू अस्वार, रामभाऊ आस्वार,किशोर आस्वार, अनिल आस्वार, सुखदेव खडागळे, सुनिल बागूल समाज बांधवाची माहिलाची प्रमुख उपस्थिती होती.

## महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर विभागीय सचिव पदी सतीश पाठक यांची निवड



**कन्नड (कृष्णा शिंदे)** : महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनची सर्वसाधारण सभा दिनांक ३ ऑगस्ट२०२५ रोजी आमदार निवास नागपूर येथे पार पडली या सभेमध्ये भारतीय क्रीडा विकास संहिता - २०११ नुसार राज्य हॉलीबॉल संघटनेच्या पदाधिकाऱ्याची निवडणुकी द्वारे निवड करण्यात आली निवडलेल्या महाराष्ट्र हॉलीबॉल असोसिएशनच्या संचालक मंडळाचा कालावधी २०२५ ते २०१९ असा राहील या संचालक मंडळात प्रमुख आश्रयदाते म्हणून माननीय नामदार नितीन जी गडकरी केंद्रीय मंत्री .अध्यक्ष म्हणून श्री विजय डांगरे चेअरमन संजय नाईक कार्यकारी अध्यक्ष अनुप पोटे सचिव प्रा निलेश जगताप सहसचिव श्री अरविंद गवई व कोषाध्यक्ष श्री सुनील हांडे यांची बहुमताने निवड करण्यात आली . याच सभेमध्ये छत्रपती संभाजी नगर विभागीय सचिव म्हणून श्री सतीश पाठक यांची एक मताने निवड करण्यात आली श्री सतीश पाठक हे हॉलीबॉलचे राष्ट्रीय खेळाडू असून बऱ्याच वर्षापासून हॉलीबॉल जिल्हा संघटनेमध्ये कार्यरत आहेत . श्री सतीश पाठक यांचे विभागीय हॉलीबॉल सचिव म्हणून निवड झाल्याबद्दल श्री मोईनकादरी सर सय्यद रफत, उमेश शिंदे, , प्रविण शिंदे सोमनाथ टाक ,सोमनाथ पचलूरे, , डॉ विजयकुमार शिंदे अभिजीत दिक्कत आशिष शुक्ला एकनाथ साळुंखे, जगन्नाथ , नारायण शिंदे ,गणपत पवार, रोहित पाटील, विलास राजपूत, ज्योती दांडगे, जगन्नाथ अधाने व प्रफुल कुलकर्णी यांनी त्यांचे अभिनंदन केलेआहे .

## माळीवाडा येथे अखंड टाळ वाजता सप्ताह कालाचे किर्तन संपन्न

**दौलताबाद (जावेद अहमद)** : दि.6 माळीवाडा येथे मारुती मंदिरातील पहारा आठ दिवस अखंड टाळ वाजता सप्ताहा सुरु झाली. हा सप्ताह 50 वर्षे पासुन सुरु आहे. या अखंड टाळ वाजता सप्ताहाची सुरुवात सरला बेट येथील गंगागिरी महाराज यांनी 50 वर्षे पुर्वी माळीवाडा गावाला नारळ दिले होते व अखंड टाळ सप्ताह चालु करा असे सागितले होते.तेव्हा पासुन रामराव पाटील मुळे (सावता बाबा) यांच्या प्रेनेने अखड टाळ वाजता सप्ताह आज हि चालु आहे यामध्ये गावातील आठ दिवस अखंड टाळ वाजवण्यासाठी गावातील या आडनावाचे भक्त अंखड टाळ वाजतातपहिल्या दिवशी मुळे, दुसऱ्या दिवशी हेकडे,तिसऱ्या दिवशी आढाव देवतकर गाणार बर्डे,चवथ्या दिवशी पल्हाळ फटागडे शेरकर,पाचव्या दिवशी भगत धनायत,सहाव्या दिवशी जगधने गाजरे ढंगारे जाधव व गावकरी मंडळी अखंड टाळ वाजता असतात.या सप्ताहाची सागता कालाचे किर्तन हभप श्री गोपाल महाराज यांचे किर्तनाने होते. व दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम समाप्ती झाली.






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ७ ऑगस्ट २०२५

# भास्कर जाधव यांना अश्रू अनावर



**रत्नागिरी** : गेल्या काही महिन्यांपासून राज्यात मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने विरोधी पक्षातील अनेक पदाधिकारी सत्ताधारी पक्षात प्रवेश करत आहेत. याचा मोठा फटका शिवसेना ठाकरे गटाला बसत आहे. नाशिकनंतर आता कोकणातीलही काही पदाधिकाऱ्यांनी ठाकरेंची साथ सोडली आहे.

याच पार्श्वभूमीवर आयोजित एका मेळाव्यात शिवसेना नेते भास्कर जाधव यांना अश्रू अनावर झाले. त्यांचा मुलगा विक्रांत जाधव भाषण करत असताना, भास्कर जाधव भावूक झाल्याचे दिसून आले. याआधीही एका मेळाव्यात त्यांना असे अश्रू आवरता आले नव्हते. राजकीय घडामोडींमुळे त्यांना झालेल्या वेदना यातून दिसून येतात.

वेळणेश्वर येथे आयोजित एका मेळाव्यात त्यांचा मुलगा विक्रांत जाधव भाषण करत असताना, जाधव यांचे डोळे पाणावले. जिल्हा परिषद उपाध्यक्ष महेश नाटेकर आणि सदस्य नेत्रा ठाकूर यांनी त्यांची साथ सोडल्यानंतर हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

विक्रांत जाधव आपल्या भाषणात, 'आपल्यासोबत घात नाही, तर विश्वासघात झाला आहे,' असे म्हटल्यावर भास्कर जाधव यांचा कंठ दाटून आला. त्यांनी टॉवेलने डोळे पुसले. याआधीही जाधव यांच्या नाराजीच्या चर्चा सुरू होत्या. महाविकास आघाडीत मंत्रिपद न मिळाल्याने ते नाराज असल्याची चर्चा होती. त्यानंतर त्यांच्या पक्षांतराचीही जोरदार चर्चा सुरू झाली होती.

आमदार भास्कर जाधव यांनी आपल्या घरकाम करणाऱ्या सुप्रियाच्या लग्नासाठी सर्व कार्यक्रम बाजूला ठेवले. मे महिन्यात असलेल्या या लग्नासाठी ते पत्नी, मुले, पुतणे आणि सुनांसमवेत पांगारी गावातील सडेवाडी येथे पोहोचले. लग्न पार पडल्यानंतर जाधव कुटुंब जेव्हा सुप्रियाला भेटायला गेले, तेव्हा हा क्षण अत्यंत भावूक झाला.

सुप्रियाने भास्कर जाधव यांच्या पत्नी सुवर्णाताई आणि सून स्वरा यांना कडकडून मिठी मारली आणि तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. बापाचं प्रेम देणाऱ्या भास्कर जाधवांचाही कंठ दाटून आला आणि त्यांच्याही डोळ्यांतून अश्रू तरळले. आपुलकीच्या या नात्याची साक्ष देणारा हा हळवा क्षण पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903

# वनताराने कोल्हापूर वासियांची मागितली माफी



**अहदमनगर** : कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी गावातील जैन मठातील 'माधुरी' हत्तीणीच्या स्थलांतराच्या वादावर वन्यजीव संघटना 'वनतारा'ने बुधवारी एक निवेदन जारी केले. त्यात म्हटले आहे की, 'माधुरी' हत्तीणीला वनतारा येथे हलवण्याचा निर्णय त्यांचा नव्हता, तर तो माननीय सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार झाला.

वनतारा म्हणाले की, न्यायालयाच्या निर्देशांनुसार, त्यांची भूमिका माधुरीची काळजी, पशुवैद्यकीय मदत आणि तात्पुरते पुनर्वसन यापुरती मर्यादित होती. त्यांनी माधुरीला स्थलांतरीत करण्याची शिफारस केली नाही किंवा कोणताही निर्णय घेतला नाही. जर आमच्या कोणत्याही शब्दांमुळे, निर्णयांमुळे किंवा कार्यपद्धतीमुळे जैन समुदायाचे किंवा कोल्हापूरच्या लोकांना दुखावले असेल तर आम्ही त्याबद्दल मनापासून माफी मागतो.

16 जुलै रोजी, मुंबई उच्च न्यायालयाने माधुरीला वनतारा येथे हलवण्याचा आदेश दिला होता. पेटा इंडियाने हत्तीणीच्या आरोग्याबद्दल, संधिवाताबद्दल आणि मानसिक ताणाबद्दल चिंता व्यक्त केल्यानंतर हा आदेश देण्यात आला.

डिसेंबर 2024 मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाने हत्तीणीच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी तिला गुजरातमधील वनतारा प्राणी अभयारण्यात हलवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर 29 जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयानेही हा आदेश कायम ठेवला. हा खटला 2023 पासून सुरू आहे.

माधुरीला वनतारा येथे हलवण्यात आल्यानंतर कोल्हापुरात मोठा निषेध व्यक्त करण्यात आला. तिला परत आणण्यासाठी लोकांनी स्वाक्षरी मोहीत राबवली. धार्मिक परंपरा आणि भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला.

- स्थानिक भाविकांच्या आणि मठाशी संबंधित संतांच्या भावनांचा आदर करत, वनतारा म्हणाले की त्यांना कोल्हापूर आणि जैन समुदायाच्या भावना समजतात. ते त्यांचा आदर करतात.
- जर महाराष्ट्र सरकार आणि मठाने सर्वोच्च न्यायालयात माधुरीच्या कोल्हापूरला परतण्यासाठी कायदेशीर परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला, तर वनतारा त्यांना पूर्ण पाठिंबा देईल. तिच्या सुरक्षित आणि सन्माननीय परतीसाठी सर्व तांत्रिक आणि वैद्यकीय सहाय्य प्रदान करेल.
- कोल्हापूरजवळील नांदणी परिसरात माधुरीसाठी एक रिमोट रिहॅबिलिटेशन सेंटर उभारता येईल, हे सेंटर मठ आणि राज्य सरकारच्या सहकार्याने चालवले जाईल. प्रस्तावित सेंटरमध्ये हायड्रोथेरपी तलाव, वेगळे स्विमिंग पूल, लेसर थेरपी, रबर फ्लोअरिंग प्लॅटफॉर्म, सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालये आणि माधुरीला बरे होण्यास आणि आरामदायी जीवन जगण्यास मदत करण्यासाठी खुल्या हिरव्या जागा यासारख्या आधुनिक सुविधा असतील. तिला साखळ्यांशिवाय मुक्तपणे फिरण्याची परवानगी देखील असेल.
- हा प्रस्ताव कोणत्याही प्रकारचे श्रेय घेण्यासाठी किंवा संस्थेच्या फायद्यासाठी नाही, तर केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांचे पालन करण्यासाठी आणि माधुरीच्या कल्याणासाठी आहे. जर मठ किंवा महाराष्ट्र सरकार न्यायालयासमोर कोणताही पर्यायी प्रस्ताव मांडू इच्छित असेल, तर ते त्यासाठी पूर्णपणे तयार आहेत आणि त्यात सहकार्य करतील, असेही संस्थेने म्हटले आहे.

वनतारा संस्थेने म्हटले आहे की, जर त्यांच्या कोणत्याही बोलण्याने, निर्णयाने किंवा कृतीमुळे जैन समुदाय किंवा कोल्हापूरमधील लोकांना दुःख झाले असेल, तर ते मनापासून माफी मागतात. "मिच्छामी दुक्कडम" जर आम्ही कोणालाही जाणूनबुजून किंवा नकळत दुखावले असेल, तर कृपया आम्हाला क्षमा करा. आमचा उद्देश केवळ माधुरीचे कल्याण आहे. आम्ही सर्वांनी मिळून तिच्या हितासाठी एकत्र आले पाहिजे.

1992 मध्ये कोल्हापूरच्या नांदणी गावातील जैन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठात माधुरी नावाची हत्ती आणण्यात आली होती. या जैन मठात 700 वर्षांपासून हत्ती पाळण्याची परंपरा आहे. हा धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा एक भाग आहे. माधुरी हत्तीणी फक्त 4 वर्षांची असताना तिला येथे आणण्यात आले होते. ती 32 वर्षांपासून येथे राहत होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ७ ऑगस्ट २०२५


## रामदास कदम म्हणजे 'बामदास छमछम' - भास्कर जाधवांचा हल्लाबोल



**रत्नागिरी :** शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांनी आज सभा घेत जोरदार भाषण केले. भास्कर जाधव यांनी त्यांच्या आक्रमक शैलीत सत्ताधाऱ्यांवर चांगलाच हल्लाबोल केला. यावेळी बोलताना त्यांनी जे पक्ष सोडून गेले त्यांच्यावर टीका केली तसेच शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांच्यावर देखील टोलेबाजी केली. रामदास कदम यांचा 'बामदास छमछम' असा उल्लेख करत त्यांची खिल्ली उडवली.

रामदास कदम यांच्यावर टीका करताना भास्कर जाधव म्हणाले, रामदास कदम म्हणायचे नाही आता बामदास छमछम म्हणायचं. मी त्या रामदास कदम बद्दल फार काही बोलत नाही. मूर्ख आहे तो, हे येडं आहे अशा शब्दात त्यांनी कदम यांना सुनावले आहे. रोज सकाळ - संध्याकाळ ते उद्धव ठाकरेंवर बोलत असतात. पण रामदास कदम स्वतःच पोराला संपवतोय. भाषणात काय म्हणतो भास्कर जाधव माझ्या पाया पडतो मला तिकीट दे म्हणून.

मी कधीही रामदास कदम यांच्या पाया पडलो नाही. आई कोटेश्वरीच्या मंदिरात उभा राहा, मी पण येतो, मी कधी पाया पडलो नाही, पण हा माझ्या दोन वेळा पाया पडला. २००९ ते २०१४ मध्ये मी मंत्री असताना रामदास कदम यांनी एक दिवस माझे पाय धरले होते. ते ही विधिमंडळाच्या लॉबीत अधिवेशन चालू असताना. शिवाय मला विरोध करू नको, मी राष्ट्रवादीत येतोय. मला राज्यमंत्रिपद देत आहेत. पण मी कॅबिनेट मागतोय, मला देत नाहीत असे ही कदम यांनी आपल्याला सांगितले होते. त्यावर आपण कशाला विरोध करू असे उत्तर त्यांना दिले होते.

रामदास कदम हा वाघ नाही तर हा बिबट्या आहे. नागपूर अधिवेशनात एकदा ते मला भेटले. त्यावेळी रडायला लागले असे म्हणत त्यांनी कदम यांची नक्कल केली. शिवाय माझ्या योगेशदादाला सांभाळा म्हणून त्यांनी आपले पाय धरले असे ही भास्कर जाधव यावेळी म्हणाले. तू माझ्या पाया पडलास, मी तुझ्या पाया पडलो नाही असे थेट जाधव यावेळी म्हणाले. यावेळी त्यांनी त्यांच्या डान्सबार प्रकरणावर ही वक्तव्य केले. लाज वाटली पाहिजे तुम्हाला ३० वर्षे बार पत्नीच्या नावावर होता. हे भडवेगिरीचे पैसे कमावले असा हल्लाबोल त्यांनी केला. तुम्ही गृहराज्यमंत्री होतात तेव्हाही आणि आता मुलगा गृहराज्यमंत्री झाला तेव्हा बार बंद करावासा वाटला नाही असा टोलाही त्यांनी लगावला.

पहलगाममध्ये २६ पर्यटकांना जात धर्म विचारून मारण्यात आले, त्यानंतर त्याला उत्तर म्हणून ऑपरेशन सिंदूर करण्यात आले. कोणाचा तरी नवरा पत्नीच्या देखत मारला गेला, कोणाचा मुलगा आपल्या आईसमोर मारला गेला. एक तर नवीनच लग्न झालेले जोडपे तिथे फिरायला गेले होते. लग्नाच्या चौथ्या दिवशीच तिच्या नवऱ्याला तिच्या डोळ्या देखत मारण्यात आले. तुम्ही सगळ्यांनी तो फोटो पाहिला असेल, ती पत्नी आपल्या मृत पतीचा देह मांडीवर घेऊन बसली होती. तो फोटो ऑपरेशन सिंदूरच्या बॅनरवर लावले गेले. आपण भावनिक होतो.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा पंतप्रधान पदाचे उमेदवार होते, तेव्हा हे देशभर फिरत भाषणात तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांना प्रश्न विचारात होते भारतात अतिरेकी येतात कुठून? आज या देशाचे पंतप्रधान मोदी अकरा वर्ष झाले पंतप्रधान आहेत. आपण कोणीतरी हा प्रश्न विचारू नये म्हणून आपण चौकीदार असल्याचे सांगतात. ऑपरेशन सिंदूर ३५ मिनिटे चालले आणि युद्ध बंदीची घोषणा कोणी केली डोनाल्ड ट्रॅम्प यांनी.

मोदींना लोकसभेत प्रश्न विचारण्यात आला, त्यावर उत्तर देताना त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना शिव्या दिल्या, इंदिरा गांधींना शिव्या दिल्या. उत्तर दिले पाहिजे त्यांनी. सगळी यंत्रणा तुमच्या हातात असताना हे अतिरेकी आले कसे? कॉंग्रेसला प्रश्न विचारात होता तुम्ही. हे अतिरेकी देशात आले, राहिले आणि २६ जणांना मारून गेले. तिथे एकही मिलिटरीचा माणूस कसे काय पोहोचला नाही? चौकीदार म्हणून तुम्ही योग्य आहात? देशाला तुम्ही फसवत आहात.

इंदिरा गांधी जेव्हा पंतप्रधान होत्या तेव्हा पाकिस्तानसोबत युद्ध झाले होते. तेव्हा सगळ्या जगाने भारतीय सैन्य मागे घ्यायला सांगितले, तेव्हा इंदिरा गांधींनी ठणकावले आणि उत्तर दिले खबरदार आमच्यामध्ये पडलात तर. त्यांनी सैन्य तर मागे घेतले नाहीच शिवाय युद्ध जिंकूनही दाखवले. आज आपल्याला पाकव्याप्त काश्मीर मिळवण्याची संधी होती. पण यांनी माघार घेतली. ज्यावेळी हल्ला झाला तेव्हा पंतप्रधान दुसऱ्या देशात होते, तिकडून आल्यावर ते निवडणुकीच्या प्रचाराला गेले.

## लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहादाचा प्रयोग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील वैजापूर येथे श्री संत सद्गुरू योगिराज गंगागिरीजी महाराज यांच्या १७८ वा अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात आले होते. त्यानुसार देवेंद्र फडणवीस या ठिकाणी दाखल झाले होते. यावेळी भाषण करताना विरोधकांवर जोरदार हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी केला. लोकसभेच्या वेळेस झालेल्या व्होट जिहादाला आम्ही आध्यात्मिक शक्तीने हरवले, अशी टीका फडणवीस यांनी केली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी जेव्हा मुंबईवरून विमानातून निघालो तेव्हा खाली समुद्र पाहताना विचार आला की किती मोठा हा समुद्र आहे. त्यावेळी आम्हाला कल्पना नव्हती की या ठिकाणी सप्ताहाला आल्यानंतर जनतेचा समुद्र पाहायला मिळतोय, ज्यावेळी खाली उतरलो त्यावेळी मी दाखवले की भाविकांचा अथांग समुद्र इथे आहे. आज रामगिरी महाराज अतिशय समर्थपणे गंगागिरी महाराजांची परंपरा चालवत आहेत. इथली शिस्त आणि भाविकता तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रसाद देताना जी तत्परता दिसते ही जगा वेगळे आहे.

रामगिरी महाराजांचे मुख्यमंत्री बंगल्यावर निमंत्रण द्यायला मला आवडलेच असते, पण मी त्यांना निरोप दिला की आधी मला तुमच्या दारी येऊ द्या, शनिदेवाचे दर्शन घेऊ द्या, तुमचे दर्शन घेऊ द्या आणि या सर्व भाविकांचे दर्शन घेऊ द्या. मग तुम्ही मुंबईला या. याचे कारण आपल्या सगळ्यांना माहीत आहे की लोकसभेच्या निवडणुकीत या महाराष्ट्रात एक प्रयोग झाला आणि त्यातून व्होट जिहाद पाहायला मिळाला. राष्ट्रीय विचारला पराजित करण्यासाठी काही लोक एकत्रित आली. ज्यावेळेस हे षड्यंत्र लक्षात आले तेव्हा आम्ही महाराष्ट्रातील आध्यात्मिक शक्तीला आव्हान दिले आणि आम्ही परमपूज्य रामगिरी महाराज आणि येथील सर्व संतांना सांगितले की हे राजकीय आक्रमण नाही, हे आक्रमण आपल्या संस्कृतीवर आहे.

काही मूठभर लोक एकत्र येऊन संतांच्या विचारांना, राष्ट्राच्या विचारांना पराजित करू शकतात अशी भावना तयार झाली तर मागच्या काळात आमच्या मंदिरांवर आक्रमण झाले, संस्कृतीवर आक्रमण झाले तसे मूक आक्रमण पुन्हा पाहायला मिळेल. सरकार येतील, सरकार जातील कोणतीच खुर्ची कायम राहत नसते. पण, आपला देश आणि आपला धर्म कायम राहिला पाहिजे. आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितले होते की स्वराज्य कशासाठी देव देश आणि धर्माकरता. मी आध्यात्मिक शक्तीचे साष्टांग दंडवत घालत प्रणाम करतो.

## लाडक्या दाजींवर कारवाई होणार

**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अल्पावधीतच लोकप्रिय ठरली. गरीब आणि गरजू महिलांसाठी राबवण्यात आलेल्या या योजनेचा लाभ तब्बल दोन कोटी महिलांनी घेतला. मात्र, निवडणुकीच्या काळात योग्य पडताळणी न झाल्याचा गैरफायदा घेत काही पुरुषांनीही या योजनेत नाव नोंदवून सरकारी मदतीचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आता या पुरुषांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असून, बोगस लाभार्थ्यांकडून लाभ रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकारामुळे शासनाच्या हेतूवर अनेकांनी शंका उपस्थित करून पडताळणी प्रकियेवर आक्षेप नोंदवला होता. तसेच लाडकी बहीण योजना ही मतांसाठी सुरू केलेली होती, अशी टीकाही विरोधकांनी सरकारवर केली होती. दरम्यान, लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपयांचा भार येत असून, त्यामुळे तातडीने खात्रीशीर पडताळणी करून गैरफायदा घेतलेल्या सर्व प्रकरणांवर कठोर पावले उचलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्य सरकारच्या माहितीनुसार, जवळपास १४ हजार पुरुषांनी लाडकी बहीण योजनेअंतर्गत आर्थिक मदत घेतली आहे. या प्रकारानंतर सरकारवर मोठ्या प्रमाणात टीका झाली असून, योजनेतील पडताळणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. सरकार आता यावर कठोर पावले उचलण्याच्या तयारीत असून, संबंधित पुरुषांवर कारवाईसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. सूत्रांनुसार, बोगस लाभार्थी म्हणून नोंद झालेल्या पुरुषांकडून ११ महिन्यांचे लाभाचे पैसे म्हणजेच प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये वसूल केले जाणार आहेत. यासोबतच शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903